

Maharogi Sewa Samiti, Warora
Anand Niketan College, Anandwan
Warora, Dist. Chandrapur, Maharashtara
FIT INDIA
Department of Physical Education & Sports
Organise
FIT INDIA FREEDOM RUN
On the Occasion Of 75th Years Of Independence Day
1600 M
MEN
800 M
WOMEN
Venue :-
Anand Niketan College, Anandwan
Date - 16 Aug 2021
Time - 8:00 AM

Maharogi Sewa Samiti,warora

# Anand Niketan College,Anandwan

Warora,Dist. Chandrapur, Maharashtra

## Department of Physical Education & Sports

Presents

# Fit India Freedom Run

On the occasion of 75th year of independence day

**1600 M MENS**

Cash Prizes & Medals

**800 M WOMEN**

Registration fee - 100 ₹

Venue ~ Anand Niketan College, Anandwan
Date ~ 16 Aug 2021
Time ~ 8:00 AM

Registration Opens - 10 Aug to 14 Aug

Place - Dept. of Physical Education & Sports

For Enquiry – 9130696383,7378714186

# FIT INDIA FREEDOM RUN
# FINAL RESULT 1600M (MEN)

| SR.NO | NAME OF ATHLETE | BIB NO | TIMING | QUALIFYING STATUS |
|---|---|---|---|---|
| 1 | PRAFUL DEODATE | 285 | 4:57:53 | 1ST |
| 2 | MANGESH DODKE | 301 | 5:00:72 | 2ND |
| 3 | DINESH CHUDHARI | 157 | 5:02:69 | 3RD |
| 4 | ADARSH TELKAPALLIWAR | 236 | 5:04:06 | 4TH |
| 5 | SAURABH CHARDE | 107 | 5:05:82 | 5TH |
| 6 | ADITYA BISEN | 116 | 5:06:81 | 6TH |
| 7 | ASHOK MISTRI | 168 | | 7TH |
| 8 | SURAJ PAWAR | 171 | | 8TH |
| 9 | ROSHAN LAMBAT | 188 | | 9TH |
| 10 | VISHAL ZILE | 024 | | 10TH |
| 11 | PRAFUL DAKOTE | 088 | | 11TH |
| 12 | SAURABH MATTE | 224 | | 12TH |




स्पर्धेतील विजयी स्पर्धक

# आनंदवनात 'फिट इंडिया फ्रिडम रन' स्पर्धा

◆ **वरोडा, २१ ऑगस्ट**

देशाच्या ७५ व्या स्वातंत्र्य दिनाच्या अमृतमहोत्सवाच्यानिमित्त आनंदनिकेतन महाविद्यालय व शारीरिक शिक्षण क्रीडा विभाग यांच्या वतीने महाविद्यालयाच्या मैदानावर १६ ऑगस्ट रोजी फिट इंडिया फ्रीडम रन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

भारत सरकारने सुरू नुकत्याच केलेल्या 'फिट इंडिया फ्रीडम रन २.०' या उपक्रमाच्या प्रेरणेतून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृणाल काळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्याला पत्रकार वाल्मिक बन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी उपप्राचार्या प्रा. राधा सवाणे, बाबा आगलावे, दिवाकर टापरे, बाळू पिसाळ, डॉ. सागर वझे, गोपाल नरुले, गणेश भिवदरे, प्रतिक मांडवगडे, अतुल सारसर व्यासपीठावर उपस्थित होते.

ही धावण्याची संपूर्ण स्पर्धा खुल्या वयोगटासाठी १६०० मीटर पुरुष गटात आणि ८०० मीटर महिला गटामध्ये घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये वेगवेगळ्या भागांमधून २०० खेळाडू सहभागी झाले होते. पुरुष व महिला गटामध्ये प्रथम सहा विजयी स्पर्धकांना रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात आले आणि इतर सहा स्पर्धकांना प्रोत्साहनपर सन्मानचिन्ह देण्यात आले तसेच संपूर्ण स्पर्धकांना डिजिटल स्वरूपामध्ये प्रमाणपत्र देण्यात आले.

पुरुष गटामध्ये प्रथम पारितोषिकाचा मानकरी प्रफुल्ल देवतळे (३ हजार रुपये रोख) हा, तर मंगेश दोडके (२ हजार रुपये रोख) हा द्वितीय, दिनेश चौधरी (१ हजार ५०० रुपये रोख) हा तृतीय आणि आदर्श तेलकापल्लीवर (१ हजार रुपये रोख) चतुर्थ क्रमांकाचा मानकरी ठरला. त्याचप्रमाणे महिला गटामध्ये प्रथम पारितोषिकाची मानकरी डिंपल खाडे (२ हजार रुपये रोख), द्वितीय जैनाब खान (१ हजार ५०० रुपये रोख), तृतीय श्रुतिका तोडसे (१ हजार रुपये रोख) आणि चतुर्थ परितोषिक भुमेश्वरी सिंघ (५०० रुपये रोख) यांनी पटकावले. तसेच या स्पर्धेचे आकर्षण ठरलेल्या लहान खेळाडूंनाही सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेचे आयोजन शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग प्रमुख प्रा. तानाजी बायस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली व महाविद्यालयाचा वरिष्ठ खेळाडू ओमकार चट्टे यांच्या नेतृत्वाखाली मैदानावर नियमित सराव करणाऱ्या सर्व खेळाडूंनी संपूर्ण जबाबदारीने एकत्रित येऊन आयोजन केले.

प्राचार्य डॉ. मृणाल काळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बक्षीस वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून हिरालाल बाघेले उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सर्व विजेत्या खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. तसेच अध्यक्षांच्या हस्ते पत्रकार वाल्मिक बन यांचा महाविद्यालयातर्फे उत्कृष्ट पत्रकार म्हणून सत्कार करण्यात आला.

संचालन महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी दर्शना कुत्तरमारे आणि सायली उपरे यांनी संयुक्तपणे केले, तर आभार अमित दातारकर यांनी मानले. ◀*(तभा वृत्तसेवा)*

# आनंदनिकेतनमध्ये फिट इंडिया फ्रीडम रन स्पर्धा



वरोरा : अमृत मोहत्सवी स्वातंत्र्यदिनानिमित्त महारोगी सेवा समितीद्वारा संचालित, आनंद निकेतन महाविद्यालय व शारीरिक शिक्षण क्रीडा विभाग यांच्या वतीने महाविद्यालयाच्या प्रांगणावर फिट इंडिया फ्रीडम रन स्पर्धेचे आयोजन १६ ऑगस्ट रोजी करण्यात आले होते.

या स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मृणाल काळे तर प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार वाल्मिक बन, उपप्राचार्य प्रा. राधा सवाणे, बाबा आगलावे, दिवाकर टापरे, बाळू पिसाळ, डॉ.सागर वझे, गोपाल नरुले, गणेश भिवदरे, प्रतीक मांडवगडे, अतुल सारसर आदी उपस्थित होते. धावण्याची स्पर्धा खुल्या वयोगटामध्ये १६०० मीटर पुरुष गटात आणि ८०० मीटर महिला गटामध्ये घेण्यात आली .या स्पर्धेमध्ये वेगवेगळ्या भागांमधून एकूण २०० खेळाडूंनी सहभाग घेतला. पुरुष व महिला गटामध्ये प्रथम सहा विजयी स्पर्धकांना रोख पारितोषिक व स्मृतीचिन्ह देण्यात आले. इतर सहा स्पर्धकांना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले. तर संपूर्ण स्पर्धकांना डिजिटल स्वरूपामध्ये प्रमाणपत्र देण्यात आले.

पुरुष गटामध्ये प्रफुल देवतळे हा प्रथम पारितोषीकाचा मानकरी ठरला त्याला तीन हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात आले. दोन हजार रुपयांचे द्वितीय पारितोषिक मंगेश दोडके याने, दीड हजार रुपयांचे तृतीय दिनेश चौधरी याने आणि एक हजार रुपयांचे रोख चतुर्थ पारितोषिक आदर्श तेलकापल्लीवर याने पटकाविले. त्याचप्रमाणे महिला गटामध्ये दोन हजार रुपयांच्या प्रथम पारितोषिकाची मानकरी डिंपल खाडे, द्वितीय दीड हजार रुपयांची मानकरी जैनाब खान आणि तृतीय एक हजार रुपयांची मानकरी श्रुतिका तोडसे ही ठरली. पाचशे रुपयांचे चतुर्थ क्रमांकाचे बक्षिस भुमेश्वरी सिंघ हिने मिळविले. या स्पर्धेचे आकर्षण ठरलेल्या लहान मुलांनासुद्धा स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेचे आयोजन शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग प्रमुख प्रा. तानाजी बायस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली मैदानावर नियमित सराव करणाऱ्या सर्व खेळाडूंनी महाविद्यालयाचा वरिष्ठ खेळाडू ओमकार चट्टे याच्या नेतृत्वाखाली केले. कोवीड-१९ च्या महामारीमुळे खूप दिवसानंतर अशा प्रकारच्या मोठ्या मैदानी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मृणाल काळे तर प्रमुख अतिथी म्हणून हिरालाल बाघेले उपस्थित होते. पाहुण्यांच्या हस्ते सर्व विजेत्या खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. तसेच अध्यक्षांच्या हस्ते पत्रकार वाल्मिक बन यांचा महाविद्यालयातर्फे सत्कार करण्यात आला.

20/08/2021



# आनंदवनच्या भूमीवर 'फिट इंडिया फ्रीडम रन' स्पर्धा

वरोरा : महारोगी सेवा समिती संचालित, आनंद निकेतन महाविद्यालय व शारीरिक शिक्षण क्रीडा विभागाच्या वतीने महाविद्यालयाच्या मैदानावर भारत सरकारने सुरु केलेला फिट इंडिया फ्रीडम रन २.० या उपक्रमाच्या प्रेरणेतून 'फिट इंडिया फ्रीडम रन' स्पर्धेचे आयोजन केली होते. उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृणाल काळे तर प्रमुख पाहुणे म्हणून सत्कार मूर्ती पत्रकार वाल्मीक बन, उपप्राचार्य प्रा. राधा सवणे, बाबा आगलावे, दिवाकर टापरे, बाळू पिसाळ, डॉ. सागर वझे, प्रायोजक गोपाल नरुले, गणेश भिवदरे, प्रतीक मांडवगडे, अतुल सारसर आदी उपस्थित होते. पुरुष गटात प्रथम पारितोषिक प्रफुल देवतळे, द्वितीय मंगेश दोडके, तृतीय दिनेश चौधरी, चतुर्थ आदर्श तेलकापल्लीवर, महिला गटात प्रथम डिंपल खाडे, द्वितीय जैनाब खान, तृतीय श्रुतिका तोडसे, चतुर्थ भुमेश्वरी सिंघ विजयी ठरले. या स्पर्धेचे आयोजन शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग प्रमुख प्रा. तानाजी बायस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली मैदानावर नियमित सराव करणाऱ्या खेळाडूंनी महाविद्यालयाचा वरिष्ठ खेळाडू ओमकार चट्टे याच्या नेतृत्वाखाली केले. बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मृणाल काळे, तर प्रमुख पाहुणे म्हणून हिरालाल बाघेले उपस्थित होते. यावेळी पत्रकार वाल्मिक बन यांचा महाविद्यालयातर्फे सत्कार करण्यात आला. संचालन विद्यार्थिनी दर्शना कुत्तरमारे तर आभार सायली उपरे, अमित दातारकर यांनी मानले.

20/08/2021
पुण्यनगरी